CMYK

बीड । शनिवार
२२.०३.२०२५
वर्षे : ४ अंक : ३४३
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 

# धनंजय मुंडे यांचा थेट कुठेही संबंध आढळलेला नाही



# वाल्मीक हा मुंडेंचा राईट हँड: मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## ‘त्यांच्याविरोधातील कोणताही पुरावा नाही; विनाकारण सनसनाटी तयार करू नये’

**मुंबई । प्रतिनिधी**

सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणात वाल्मीक कराड हा मुख्य आरोपी असल्याचं सीआयडीने स्पष्ट केल्यानंतर राष्ट्रवादीचे नेते धनंजय मुंडे यांना आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला. परंतु हा राजीनामा घेण्यास उशीर केला का, असा प्रश्न उपस्थित करत सरकारला लक्ष्य केलं जात आहे. तसंच या प्रकरणात मुंडे यांच्याभोवतीही संशयाचं धुकं निर्माण झाल्याने त्यांचीही चौकशी करण्यात यावी, अशी मागणी होत आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सरकारची भूमिका मांडत पुरावा दिल्यास धनंजय मुंडे यांच्यावर आजही कारवाई करायला तयार असल्याचं स्पष्ट केलं आहे. देवेंद्र फडणवीस म्हणाले की, संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी सीआयडीने कोर्टात जी चार्जशीट सादर केली आहे त्यामध्ये धनंजय मुंडे यांचा थेट कुठेही संबंध आढळलेला नाही. पण तपास यंत्रणांनी वाल्मीक कराड याला या हत्या प्रकरणात मुख्य आरोपी केलं आहे. हा वाल्मीक कराड धनंजय मुंडेंचा राईट हँड होता आणि गेल्या अनेक वर्षांपासून त्यांचं राजकारण सांभाळत होता. मंत्र्याच्या जवळचा व्यक्ती इतकं क्रूर कृत्य करत असेल तर तर त्या मंत्र्याने प्रायश्चित्त म्हणून आपलं पद सोडावं, अशी आमची भूमिका होती. त्यामुळे आम्ही धनंजय मुंडे यांचा राजीनामा घेतला, असं फडणवीस यांनी एका कार्यक्रमात म्हटलं आहे.

दरम्यान, या हत्येत धनंजय मुंडे यांचा कोणताही थेट संबंध आढळलेला नाही. फक्त कोणीतरी दररोज टीव्हीवर येऊन आरोप केले म्हणून कोणाचं नाव चार्जशीटमध्ये घेता येत नाही. आजही पुरावा आणून दिल्यास धनंजय मुंडे यांच्याविरोधात कारवाई केली जाईल, असा शब्दही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिला आहे.

## आ.सुरेश धस यांच्याकडून मोठ्या रुग्णालयातील उपचाराचा खर्च आणि मेडिकलची 'दुकानदारी' वर विचार करण्याची मागणी

# गोरगरीब रुग्णांची दखल घेण्याची गरज

**आष्टी । प्रतिनिधी**

राज्यातील मोठ्या हॉस्पिटल मधील अनेक हॉस्पिटल्स ही धर्मादाय अंतर्गत आर्थिक फायदा घेतात परंतु ते रुग्णांना सेवा देत नाहीत तसेच मोठे हॉस्पिटल्स मध्ये देखील उपचाराच्या खर्चापेक्षा स्वतःच्या नातेवाईकांचीच असलेली मेडिकल दुकानाद्वारे गोरगरिबांना लुटण्याचे धंदे सुरू आहेत या गंभीर प्रश्नाविषयी आ.सुरेश धस यांनी विधानसभेत आवाज उठवल्याने गोरगरीब साम ान्य नागरिकांनी व्यक्त केले आहे

या बाबतचे सविस्तर वृत्त असे की महाराष्ट्राच्या विधानसभेम ध्ये गेल्या चार महिन्यापासून राज्यभरातील अन्यायग्रस्तांचे कैवारी आणि गोरगरीब जनतेचे पाठीराखे म्हणून ओळख निर्माण केलेले धडाडीचे आ.सुरेश धस यांनी विधानसभेमध्ये मोठ्या




हॉस्पिटल मधील उपचाराचा खर्च आणि ▶▶ उर्वरित पान २ वर


# खासगी हॉस्पिटलसाठी शुल्क नियामक समिती स्थापन करा : मुळूक, गलधर

## रुग्णांची आर्थिक पिळवणूक थांबण्यासाठी आरोग्यमंत्र्यांना दिले निवेदन



**बीड । प्रतिनिधी**

गोरगरीब, वंचित व सर्वसामान्य रुग्णांसाठी शासनाने विविध आरोग्य विषयक योजना सुरु केल्या आहेत. या योजनेअंतर्गत रुग्णांवर मोफत उपचार केले जातात. मात्र बीड जिल्ह्यात आरोग्य योजना लागू असलेल्या खासगी हॉस्पिटलमध्ये रुग्णांना योजनेचा लाभ न देता त्यांना मोठ्या रकमेचे बिल भरायला भाग पाडले जाते. एवढेच नाही तर खासगी रुग्णालयात आयसीयूच्या नावाखाली रुग्णांची आर्थिक ▶▶ उर्वरित पान २ वर




# सिंदफणेच्या पाणीप्रश्नासाठी शेतकर्यासह लढू: खा. रजनीताई पाटील



## + 140 गावचे शेतकरी एकवटले, उपोषण स्थगित

**गेवराई । प्रतिनिधी**

सिंदफणेचा पाणी प्रश्न जोपर्यंत सुटत नाही तोपर्यंत आपण शेतकऱ्यांसह खांद्याला खांदा देऊन लढू, या पाणी प्रश्नासाठी लवकरच जलसंपदा मंत्री ची भेट घेऊ व शेतकऱ्यांना न्याय देऊ असा विश्वास खासदार रजनीताई पाटील यांनी व्यक्त केला. यानंतर गेल्या १९ दिवसापासून सिरसमार्ग येथे सुरू असलेले १४० गावातील शेतकऱ्यांची उपोषण

▶▶ उर्वरित पान २ वर

# डॉ. खिराजी पाखरे यांचे निधन



**बीड । प्रतिनिधी**

बीडचे प्रसिद्ध नेत्ररोग तज्ञ डॉ खिराजी दत्तोबा पाखरे (वय ६५) यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने प्रयागराज येथे शुक्रवारी दुपारी दुःखद निधन झाले. जेष्ठ नेत्या प्रा. सुशीलाताई मोराळे यांचे ते पती होते. डॉक्टर पाखरे यांच्या दुःखद निधनाने बीड जिल्ह्यामध्ये हळहळ व्यक्त होत आहे. डॉक्टर , नातेवाईक मित्र परिवार मध्ये शोक कळा पसरली आहे. त्यांच्या दुःखात दैनिक मराठवाडा पत्र परिवार सहभागी आहे.




दैनिक

## मराठवाडा पत्र

## वर्धापन दिन

वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा...

## चतुर्थ वर्धापन दिन

**सर्वांना नमस्कार,! तुमच्या प्रतिक्रिया आमच्यासाठी महत्त्वाच्या आहेत.**

आपले दैनिक मराठवाडा पत्र येत्या ३० मार्च २०२५ ला चार वर्ष पूर्ण करत असून पाचव्या वर्षांमध्ये पदार्पण करत आहे . गेल्या चार वर्षांत आपण सर्वांनी आम्हाला भरभरून प्रेम दिले. दैनिक मराठवाडा पत्रच्या चौथ्या वर्धापनदिनानिमित्त दिनांक ३० मार्च २०२५ ला आम्ही विशेषांक प्रकाशित करत आहोत. या विशेष अंकामध्ये तुमच्या प्रतिक्रिया आमच्या पुढील कार्यासाठी महत्त्वाच्या ठरतील.

आपणं आपल्या प्रतिक्रिया दिनांक २५ मार्च २०२५ पर्यंत खालील ई-मेल व मोबाईल नंबरवर पाठवाव्यात. दैनिकाबद्दल आपली प्रतिक्रिया व फोटो पाठवावा हि विनंती.

मो.क्र. ९८२२१५२९५५, Email-dailymarathwadapatra2021gmail.com
वरील नंबर व ई-मेलवर प्रतिक्रिया पाठवाव्यात.




CMYK

# स्वच्छ पाणी हे जीवन, पण बिघडले तर ते विनाश

पाणी ही निसर्गाची सर्वात मोठी देणगी आहे कारण ती संपूर्ण सजीव जगाचा आधार आहे; त्याशिवाय जीवनाची कल्पना करणे निरर्थक आहे. पाण्याच्या समृद्धीमुळे जंगल, वृक्ष, वनस्पती आणि वन्यजीव समृद्धी वाढते. सर्वांना शुद्ध पाणी आणि शुद्ध हवा मिळते. ऋतूचक्र, हवामान आणि निसर्गात संतुलन असते, अन्नाची गुणवत्ता आणि उत्पादन वाढते, त्याचा निसर्गाच्या प्रत्येक घटकावर थेट परिणाम होतो. जर सर्वांना पुरेसे शुद्ध पाणी मिळाले तर समृद्धी निश्चित आहे, परंतु जर हे पाणी अपुरे आणि प्रदूषित असेल तर हे पाणी विनाशाचे कारण आहे. जगातील सुमारे ९७ टक्के पाणी खारट आहे किंवा पिण्यायोग्य नाही. भारतात जगाची सर्वाधिक १८ टक्के लोकसंख्या आहे, पण त्या तुलनेत, भारताकडे जगातील फक्त ४ टक्के जलसंपत्ती आहे, ज्यामुळे तो पाण्याच्या टंचाई असलेल्या देशांपैकी एक बनतो, त्यामुळे लोकांना याची किंमत आपल्या जीवाने मोजावी लागते, कारण दरवर्षी लाखो भारतीय दूषित पाण्यामुळे होणाऱ्या आजारामुळे मरतात. द लॅन्सेटच्या एका अभ्यासानुसार, २०१९ मध्ये भारतात जल प्रदूषणामुळे ५,००,००० हून अधिक मृत्यू झाले.




दरवर्षी २२ मार्च रोजी जगभरात जागतिक जल दिन पाण्याचे महत्त्व आणि प्रत्यक्ष परिस्थितीबद्दल जागरूकता निर्माण करण्यास साजरा केला जातो. या वर्षी २०२५ ची थीम 'हिमनदी संवर्धन' आहे, जी भविष्यासाठी या गोठलेल्या हिमनद्यांच्या जलस्रोतांचे जतन करण्यावर लक्ष केंद्रित करते. हिमनदी हा पाण्याचा एक मोठा साठा आहे, त्याचे वितळलेले पाणी पिण्यास, शेती, उद्योग, स्वच्छ ऊर्जा उत्पादन आणि निरोगी परिसंस्थेसाठी आवश्यक आहे, परंतु सतत जागतिक तापमानवाढीमुळे मोठे हिमनदी वितळत आहेत आणि ते वितळलेले शुद्ध पाणी समुद्राची पातळी वाढवत आहे. वेगाने वितळणाऱ्या हिमनद्यांमुळे पाण्याच्या प्रवाहात अनिश्चितता निर्माण होत आहे, ज्याचा मानवांवर आणि ग्रहावर खोलवर परिणाम होत आहे. जागतिक स्तरावर कार्बन उत्सर्जन आणि कमी होत चाललेल्या हिमनद्यांना तोंड देण्यासाठी स्थानिक धोरणाची आवश्यकता आहे.

१५ जानेवारी २०२५ रोजी प्रसिद्ध झालेल्या वार्षिक जागतिक जोखीम अहवालाच्या २० व्या आवृत्तीत जागतिक आर्थिक मंचाने इशारा दिला आहे की भारताला एक गंभीर आव्हानाचा सामना करावा लागणार आहे कारण पुढील दोन वर्षांत (२०२५-२०२७) पाणीटंचाई हा देशासाठी सर्वात गंभीर धोका म्हणून उदयास येईल. शिकागो विद्यापीठाच्या एनर्जी पॉलिसी इन्स्टिट्यूटने एक अहवाल प्रसिद्ध केला आहे, ज्यामध्ये सर्वात मोठ्या वायु गुणवत्ता निर्देशांकानुसार, प्रदूषित वायु सरासरी आयुर्मान ३.६ वर्षांनी कमी करत आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या मते, दरवर्षी ३,५७५,००० लोक पाण्याशी संबंधित आजारांमुळे मृत्युमुखी पडतात. हे दर १० सेकंदाला एका मृत्यूइतके आहे. इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्चने सरकारला २०२४ च्या एका अभ्यासाची माहिती दिली आहे ज्यामध्ये असे आढळून आले आहे की पंजाबमधील प्रदूषित नद्या-नाल्यांजवळ राहणाऱ्या लोकांना कर्करोग होण्याची शक्यता जास्त असते. जल प्रदूषणाची मुख्य घटक म्हणजे औद्योगिक कचरा, सांडपाणी, सूक्ष्मजीव प्रदूषण, निलंबित पदार्थ, रासायनिक प्रदूषण, विरघळणारे प्रदूषक, किरणोत्सर्गी कचरा, औष्णिक प्रदूषण, मानवी कचरा, औद्योगिक उपक्रम, तेल प्रदूषण, कृषी प्रदूषण, जागतिक तापमानवाढ, खाणकाम, घनकचरा, आम्ल पाऊस इत्यादी. ही विशेष घटक पाण्याच्या संपर्कात येताच पाणी विषारी बनवतात. जागतिक आरोग्य संघटनेच्या मते, २०२१ मध्ये, २ अब्जाहून अधिक लोक पाण्याची कमतरता असलेल्या देशांमध्ये राहत होते. २०२२ मध्ये, जगभरात किमान १.७ अब्ज लोकांनी विष्ठेने दूषित पिण्याच्या पाण्याचे स्रोत वापरले. विष्ठेमुळे पिण्याचे पाणी दूषित होणे हे पिण्याच्या पाण्याच्या सुरक्षिततेसाठी सर्वात मोठा धोका आहे. २०२१ मध्ये, २५१.४ दशलक्षाहून अधिक लोकांना शिस्टोसोमियासिससाठी प्रतिबंधात्मक उपचाराची आवश्यकता होती. सूक्ष्मजीव शास्त्रीय दृष्ट्या दूषित पिण्याच्या पाण्यामुळे अतिसार, कॉलरा, आमांश, टायफॉईड आणि पोलिओसारखे आजार होऊ शकतात आणि दरवर्षी अतिसाराशी संबंधित अंदाजे ५,०५,००० मृत्यू होतात असा अंदाज आहे. २९६ दशलक्ष लोक असुरक्षित विहिरी आणि झऱ्यांमधून पाणी घेतात आणि ११५ दशलक्ष लोक तलाव, नद्या आणि ओढ्यांमधून प्रक्रिया न केलेले पृष्ठभागावरील पाणी गोळा करतात.

जलद शहरीकरण आणि औद्योगिकीकरणामुळे जलस्रोतांचे प्रदूषण वाढले आहे, ज्यामुळे ते वापरासाठी अयोग्य झाले आहेत. अकार्यक्षम शेती पद्धती, रसायनांचा अतिरेकी वापर, भूजलाचा अतिरेकी वापर, हवामान बदल, खराब पाणी व्यवस्थापन आणि योग्य पायाभूत सुविधांचा अभाव यासारखे अनेक घटक पाणीटंचाईचे संकट वाढविण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. जागतिक बँकेच्या काही आकडेवारीनुसार, भारतात १६.३ कोटी भारतीयांना सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध नाही, २१ कोटी भारतीयांना सुधारित स्वच्छता सुविधा उपलब्ध नाहीत. २१ टक्के संसर्गजन्य आजार हे असुरक्षित पाण्याशी संबंधित आहेत, भारतात दररोज पाच वर्षांखालील ५०० मुले अतिसारामुळे मृत्युमुखी पडतात. भारतातील अर्ध्याहून अधिक नद्या अत्यंत प्रदूषित आहेत आणि इतर अनेक आधुनिक मानकांनुसार असुरक्षित पातळीवर आहेत. शहरांमधून वाहणाऱ्या नद्यांनी नाल्यांचे रूप धारण केले आहे. नीति आयोगाच्या २०१८ च्या संमिश्र जल व्यवस्थापन निर्देशांक अहवालात असे म्हटले आहे की दरवर्षी सुमारे दोन लाख लोक सुरक्षित पाण्याच्या अपुऱ्या उपलब्धतेमुळे मृत्युमुखी पडतात. २०३० पर्यंत, सुमारे ६० कोटी लोकांना पाण्याच्या संकटाचा सामना करावा लागू शकतो, जे भारताच्या अंदाजे लोकसंख्येच्या सुमारे ४० टक्के असेल.

वॉटर या स्वयंसेवी संस्थेने म्हटले आहे की, भारतात, १.४ अब्ज लोकसंख्येपैकी, ३५ दशलक्ष लोकांना अजूनही सुरक्षित पाणी उपलब्ध नाही आणि ६७८ दशलक्ष लोकांना सुरक्षित स्वच्छता सुविधा उपलब्ध नाही. दरवर्षी दहा लाखांहून अधिक लोक सुरक्षित पाणी आणि स्वच्छतेच्या अभावामुळे मृत्युमुखी पडतात आणि दर दोन मिनिटांनी एका मुलाचा पाणी किंवा स्वच्छतेशी संबंधित आजारांमुळे मृत्यू होतो. जगातील २९ टक्के शाळांमध्ये स्वच्छ पाणी आणि शौचालये यासारख्या मूलभूत गरजांचा अभाव आहे. पाणी आणि स्वच्छतेच्या अभावामुळे दरवर्षी जागतिक स्तरावर २६० अब्ज डॉलर वाया जातात. जगातील किमान ५० टक्के लोकसंख्या वर्षातील किमान एक महिना पाण्याच्या तीव्र टंचाईत जगते. जगभरातील महिला, मुली पाण्यासाठी दररोज काही किलोमीटर चालतात आणि पाणी गोळा करण्यात २० कोटी तास घालवतात. घरात सुरक्षित पाणी आणि स्वच्छता उपलब्ध असल्याने वेळ वाचतो, यामुळे कुटुंबांना शिक्षण आणि कामाच्या संधी मिळविण्यासाठी अधिक वेळ मिळतो, ज्यामुळे त्यांना गरिबीचे चक्र तोडण्यास मदत होते.

जोपर्यंत एखाद्या गोष्टीची कमतरता नसते तोपर्यंत माणसाला त्या गोष्टीचे मूल्य कळत नाही, जीवन पाण्यावर अवलंबून असते, बहुतेक लोकांना पाणी मिळविण्यासाठी जास्त कष्ट करावे लागत नाहीत, त्यांच्या मते जगात पाणी सहज उपलब्ध आहे, कदाचित म्हणूनच लोकांना पाण्याचे मूल्य समजत नाही. कठीण परिस्थितीत पाणी उपलब्ध नसेल तर शरीर आणि मन अस्वस्थ होते. उन्हाळ्यात, जर काही कारणास्तव शहरांमधील लोकांना एक दिवसही पाणी मिळाले नाही, तर गोंधळ उडतो. मग तेव्हा पाणी ही जगातील सर्वात मौल्यवान गोष्ट वाटते. आज आपल्याला सहज उपलब्ध होणारे पाणी, कोट्यवधी लोक त्या पाण्यासाठी दररोज भटकतात, ते पाणी गोळा करण्यात आपला मौल्यवान वेळ वाया घालवतात, तरीही त्यांना पुरेशा प्रमाणात शुद्ध पाणी मिळत नाही, नाईलाजाने अशुद्ध पाणी पिण्यामुळे ते प्राणघातक आजारांना बळी पडतात आणि अकाली जीव गमावतात. पाण्याअभावी प्राणी, पक्षी आणि वन्यजीवांची स्थिती अधिकच बिकट होते. पाण्याचा अपव्यय आणि योग्य व्यवस्थापनाद्वारे त्याची साठवणूक कशी होते हे आपल्या सर्वांना माहिती आहे पण त्याचे गांभीर्य आपल्याला समजत नाही. मौल्यवान पाण्याचे महत्त्व समजून घ्या. प्रत्येक व्यक्ती आणि जीवांचा शुद्ध पाण्यावर समान हक्क आहे. सर्वांना शुद्ध पाणी मिळावे ही आपली जबाबदारी आहे. पाणी वाचवा, मौल्यवान जीव वाचवा.

**- डॉ. प्रीतम भी. गेडाम**

पान ४ वरून पुढे...

## जिल्ह्यामध्ये मनाई...

महाराष्ट्र पोलीस कायदा ३७ (१) (३) अन्वये काढण्यात येणा-या प्रतिबंधात्मक आदेशामध्ये मोर्चे, निदर्शने, आंदोलने, धरणे आंदोलने यासारख्या आंदोलनामध्ये पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तीचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येण्यास निर्बंध राहील. जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था आबाधीत राहावी या करीता कलम ३७ (१) (३ ) अन्वये मनाई आदेश जारी केला आहे. शासकीय कर्तव्य पार पाडणा-या कर्मचा-यां व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीस सार्वजनिक ठिकाणी किंवा त्यांच्या जवळपास खालील बाबीस मनाई करण्यात आली आहे. या अन्वये शस्त्र, सोटे ,काठी, तलवार, बंदूक, लाठया, काठया, कोणतेही दाहक पदार्थ, किंवा स्फोटके, दगड, किंवा इतर क्षेपाणस्त्रे, शरीरास इजा होणा-या वस्तू बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे. आवेशी भाषणे, अंगविक्षेप, विडांबनात्मक नकल, सभ्यता, नितिमत्ता यास बाधा येईल किंवा ज्यामुळे राज्याची सुरक्षिता धोक्यात येईल, किंवा अराजकता माजेल अशी चित्रे, निशाणी, घोषणा फलक किंवा इतर कोणतीही वस्तू जवळ बाळगू नये. जाहिरपणे घोषणा करणे, गाणी म्हणणे, वाद्य वाजविणे किंवा कोणतीही कृती जे देशाच्या संविधानातील मुल्र्यांच्या विरुध्द असेल किंवा देशाचा मान व सार्वभौमत्व यांना इजा पोहचणार असेल किंवा सार्वजनिक सुरक्षा आणि सामाजिक सलोखा यांना हानी पोहचणारी असेल, व्यक्तीच्या किंवा शवांच्या किंवा प्रेते किंवा आकृती,किंवा त्यांच्या प्रतिमा यांचे प्रदर्शन यासाठी मनाई आहे. पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येता येणार नाही, मिरवणूका मोर्चे काढता येणार नाही. कोणताही मोर्चा, सभा, मिरवणूक व तत्सम कोणतीही कृती करण्यासाठी त्या क्षेत्रातील सक्षम पोलीस अधिका-यांची पूर्वमान्यता घेणे आवश्यक राहील. तसेच विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणूकीस लागु राहणार नाहीत व अशी कोणतीही मनाई राज्य शासनाच्या मंजूरीशिवाय १५ दिवसापेक्षा जास्त मुदतीपर्यंत अमलात राहणार नाही.

पान ४ वरून पुढे...

## डॉ.ओमप्रकाश...

वैद्यकीय सहाय्यता कक्षाच्या माध्यमातून केलेले काम उल्लेखनीयच नाही तर ऐतिहासिक आहे. तत्कालीन सरकारमध्ये फडणवीस यांचा 'सातवा माळा' गोरगरीब रुग्णांसाठी आरोग्य मंदिर बनला होता. त्या मंदिरातील पुजारी म्हणून शेटे यांनी केलेली रुग्ण सेवा अभूतपूर्व होती, याला महाराष्ट्र साक्षी आहे. त्यावेळी लाखो लोकांना योजनेचा लाभ देत मुख्यमंत्री सहायता निधीतून ६०० कोटी व धर्मादाय कोट्यातून एक हजार दोनशे कोटींचे उपचार करण्याचा विक्रम करण्यात आला होता. मात्र महाविकास आघाडी सरकारच्या कार्यकाळामध्ये गरीब रुग्णांना उपचारासाठी मदत मिळणे दुरापास्त झाले होते. राज्यामध्ये परत देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांनी आपल्या खास विश्वासू शिलेदारांना सोबत घेण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांचे निकटवर्तीय असलेल्या डॉ. ओमप्रकाश शेटे यांनाही पदोन्नती देण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाने फडणवीस यांच्या मान्यतेने प्रधानमंत्री जनआरोग्य योजना व महात्मा फुले जनआरोग्य योजना एकत्रिकरण करुन पाच लाख रुपयांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत नेण्याची जबाबदारी डॉ. ओमप्रकाश शेटे यांच्यावर सोपवली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची महत्वकांक्षी योजना म्हणून परिचित असलेल्या आयुष्मान भारत योजनेच्या महाराष्ट्राच्या अध्यक्षपदी डॉ. ओम प्रकाश शेटे यांची निवड करण्याचा महत्वपूर्ण निर्णय फडणवीसांनी घेतला आहे. त्यांच्या निवडीचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे.

## धारूर तालूक्यातील ....

५६ ग्रामपंचायतच्या सरपंच पदाचे आरक्षण सोडत दिनांक. २५/०३/२०२५ रोजी सकाळी ११:०० वा. तळमजला, तहसिल कार्यालय धारूर येथे काढण्यात येणार आहे. तरी तालुक्यातील नागरिकांनी सदरचे आरक्षण सोडतीस उपस्थित रहावे असे आव्हान तहसीलदार श्रीकांत निळे यांनी केले आहे

## एकमेव यश...

सण असो उत्सव असो कधीही आणि कितीही घरची आठवण आली तरीही आपली पदनियुक्तीच ही आपल्या परिवाराची सुखाची चावी आहे हे समजून कोणत्याही सण उत्सवाला न जाता खुशबू नका यांनी दिवस रात्र एक करून जिद्दीने तळमळीने अभ्यास केला.

*अगर हम अदृश्य है, तो समझिये हम असरदार है*
*हे वाक्य त्यांनी खरं करून दाखवलं*

वय वर्ष फक्त २७ यात अनेक वेळा अपयश संघर्ष करावा लागला या अपयशातूनच समाजातील भिन्न विभिन्न विचारसरणी असणारे लोक यांचे टोमणे सुद्धा सहन करावे लागले पण आज तेच समाजातील लोक त्यांचा सत्कार करताना स्टेटस ठेवताना पाहायला मिळत आहेत. पण हा संघर्ष इथेच न थांबता अजूनही जिद्दीला पेटवून खुशबू नरूका तळमळीने यशाची गवसणी घालतील- *सितारों के आगे जहाँ और भी है*

राजस्थानच्या या लेकीने राजस्थानमध्येच नव्हे तर महाराष्ट्रात देखील आणि भारतामध्ये सुद्धा आपल्या कर्तुत्वाने सर्वांच्या माना उंचावले आहेत. या यशाबद्दल बीड शहरातील निवृत्त सहा पोलीस उपनिरीक्षक भागवत शिंदे यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## स्वच्छतागृहांची दुरवस्था...

बाटल्यांचा खच, फुटलेल्या फरशा अन् तुटलेली चिनी मातीची भांडी, त्याचे पाइप गायब झालेले, जागोजागी गुटख्याच्या पिचकार्या आणि दुर्गंधीचे साम्राज्य, नळ नसलेले पाण्याचे पाइप, असे चित्र नजरेस पडते. हीच परिस्थिती शहरातील सर्वच स्वच्छतागृहांची आहे यावर तात्काळ उपायोजना करून ते स्वच्छतागृह स्वच्छ करावे अशी मागणी होत आहे

पान १ वरून पुढे...

## आ.सुरेश धस...

त्याच हॉस्पिटल मधील नातेवाईकांचेच असलेल्या मेडिकल दुकानदाराची दुकानदारी याबाबतचे भीषण वास्तव मांडले असून याबाबत तात्काळ उपाययोजना करण्याची मागणी केली आहे यामुळे राज्यभरातील गोरगरीब रुग्णांची हेळसांड थांबणार असून राज्यभरातील धर्मदाय अंतर्गत असलेल्या रुग्णालयातील कारभार चव्हाट्यावर येण्याची शक्यता निर्माण झाली आहे मात्र याचबरोबर शासकीय रुग्णालयामधील व्यवस्था अध्यायवत आणि पारदर्शी करण्याची देखील गरज निर्माण झालेली आहे

आ.सुरेश धस यांच्या विधानसभेतील या अभ्यासपूर्ण विषय मांडणीमुळे गोरगरीब रुग्णांना या उपायोजनेमुळे दिलासा मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. आमदार सुरेश धस यांनी १९९९ पासून मुख्यमंत्री सहाय्यता निधी द्वारे सर्व पक्षीय सर्व धर्मीय जाती जमातीतील गरजू रुग्णांना मुख्यमंत्री सहायता निधीद्वारे करोडो रुपयांचे आर्थिक सहाय्य आतापर्यंत मिळवून दिले आहे याची मंत्रालयामध्ये सतत चर्चा असते केवळ बीड जिल्ह्यातील नव्हे तर राज्यातील अनेक जिल्ह्यातील रुग्णांना त्यांनी या सेवेचा लाभ मिळवून दिला आहे या विधानसभा निवडणुकीनंतरच्या पाचव्यांदा मिळालेल्या विजयानंतर त्यांनी गोरगरीब रुग्णांना आर्थिक सहाय्य मिळवून देण्यासाठी विधानसभा क्षेत्रांतर्गत दोन आरोग्य दूत नियुक्त केले असून त्यांच्या द्वारे विविध योजनेद्वारे रुग्णांना आर्थिक सहाय्य मिळवून दिले जात आहे आणि ज्या रुग्णांना शासनाच्या योजनेचा लाभ मिळत नाही अशा रुग्णांसाठी वैयक्तिक संपर्क साधून रुग्णांची देयके कमी करण्यामध्ये देखील ते सतत प्रयत्नशील असतात नवीन माहिती प्राप्त झाल्यानुसार पुणे शहरातील रुबी हॉल, जहांगीर हॉस्पीटल,पुणे हॉस्पिटल, संचेती हॉस्पिटल, सह्याद्री हॉस्पिटल, दीनानाथ मंगेशकर, आदित्य बिर्ला हॉस्पिटल ही रुग्णालये धर्मादाय आयुक्तालयाच्या अंतर्गत येत असूनही सर्वसामान्य रुग्णांना याची माहिती नसते

अहिल्यानगर येथील अनेक हॉस्पिटल या योजनेचा लाभ घेत आहेत परंतु रुग्णांना याची कल्पना देत नाहीत हे देखील वास्तव आहे

वास्तविक पाहता राज्यातील सर्व रुग्णांना हॉस्पिटलमध्ये धर्मादाय अंतर्गत असल्याबाबतचा फलक लावणे बंधनकारक आहे राज्यामध्ये एकूण ४३० धर्मादाय रुग्णालय असून त्यातील १० % खाटा या १ लाख ८० हजार रुपये वार्षिक उत्पन्न असलेल्या आर्थिक दुर्बलांसाठी तर आणखी १०% टक्के खाटा या निर्धन म्हणजे ८५ हजार रू वार्षिक उत्पन्न असणाऱ्या रुग्णांसाठी राखीव असतात तसेच आर्थिक दुर्बल रुग्णांना उपचारांमध्ये ५०% सवलत तर निर्धन रुग्णांना १००% मोफत मिळण्याची तरतूद उच्च न्यायालयाने सन २००३ मध्ये एका निकालाद्वारे केली आहे परंतु याबाबत गोरगरीब रुग्णांना काही फायदा होत नसल्याचे दिसून येत आहे आ.सुरेश धस यांनी आपल्या अभ्यासपूर्ण भाषणांमध्ये १) मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीतून मदत होते परंतु रुग्णालयाचे एकूण बिल आणि मिळणारी मदत यामध्ये मोठी तफावत असते. २) राज्य शासनाच्या महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेमध्ये सार्वजनिक आरोग्य विभागाने सन २०११ मध्ये संबंधित आजारांच्या उपचारासाठी जे दर निश्चित केले आहेत तेच दर सन २०२५ मध्ये देखील असल्याने रुग्णालयातील प्रशासनाने योजना अंमलात अन्याय मध्ये अडचणी निर्माण होत असल्याचे दिसून येत असल्याने या बाबीकडे लक्ष देण्याची मागणी केली आहे

३) या धर्मादाय रुग्णांवर नियंत्रण ठेवण्यासाठी ज्या समित्या गठित केलेले आहेत त्या काम करत नसल्याचे दिसून येत आहे ४) रुग्णालयातील उपचाराच्या आणि औषधांच्या दराविषयी निश्चित धोरण ठरवण्याची आवश्यकता असल्याचेही त्यांनी शासनाच्या निदर्शनास आणून दिले आहे

## खासगी हॉस्पिटलसाठी...

लूट केली जाते. यामुळे खासगी हॉस्पिटलवर नियंत्रण ठेवण्यासाठी जिल्हाधिकारी व जिल्हा शल्यचिकित्सक यांच्या अध्यक्षतेखाली जिल्ह्यात शुल्क नियामक समिती स्थापन करावी, अशी मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, स्वप्नील गलधर यांनी आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. जिल्ह्यात खासगी हॉस्पिटलमध्ये रुग्ण दाखल झाल्यानंतर आरोग्य योजनेचा प्रत्यक्ष लाभ न देता रुग्णांना मोठ्या रकमेचे बिल भरायला भाग पाडले जाते. योजना लागू नाही असे सांगून टाळाटाळ केल्याचे प्रकारही घडले आहेत. परिणामी आर्थिक दृष्ट्या दुर्बल आणि गोरगरीब रुग्णांवर मोठा अन्याय होत आहे. खासगी रुग्णालयांकडून रुग्णांना अवाढव्य बिल आकारले जाते. मात्र यावर कोणाचेही नियंत्रण नाही. यामुळे खासगी हॉस्पिटलमध्ये रुग्णांकडून आकारल्या जाणाऱ्या बिलावर नियंत्रण ठेवण्यासाठी जिल्हाधिकारी व जिल्हा शल्यचिकित्सक यांच्या अध्यक्षतेखाली जिल्ह्यात शुल्क नियामक समिती स्थापन करावी. या समितीमुळे खासगी रुग्णालयांकडून आकारल्या जाणाऱ्या शुल्काचे नियमित परीक्षण होईल. ही समिती गरजूंना न्याय मिळवून देण्यासाठी कार्यरत राहील. तसेच शासनाने ज्या रुग्णालयांना आरोग्यविषयक योजनांअंतर्गत सेवा देण्याची परवानगी दिली आहे, त्यांच्यावर काटेकोर नजर ठेवावी व त्यांची तातडीने चौकशी करावी तसेच दोषी आढळणाऱ्या रुग्णालयांवर कठोर कारवाई करण्यात यावी, जेणेकरून भविष्यात कोणत्याही रुग्णावर अन्याय होणार नाही असे शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, स्वप्नील गलधर यांनी म्हटले आहे.

## सिंदफणेच्या पाणीप्रश्नासाठी....

स्थगित करण्यात आले. यावेळी काँग्रेस जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे, युवक काँग्रेस जिल्हाध्यक्ष श्रीनिवास बेदरे, तालुकाध्यक्ष गणेश बजगुडे, भाऊसाहेब जरांगे पाटील, राजसाहेब काका पवळ, बाबुराव जेठे, शामराव घुगे, विजयकुमार करपे, डॉ. रमाकांत कुंभार, राजाभाऊ महाराज कुटे, लक्ष्मण काशीद, मधुकर नागरगोजे, काशीनाथ जोगदंड, आदीनाथ जोगदंड, गणेश कोळेकर, मोतीराम शेरकर, महेश गिराम, अशोक काळे, राजू शेख, राजेश तळेकर, सरपंच नवनाथ गवते, सरपंच नंदकुमार शिंदे, सरपंच चौधरी, सचिन पवळ, राहुल लोंढे, गणेश हाडुळे, रामदास महाराज निर्मळ, सरपंच कोळेकर, अण्णासाहेब वाणी, दिपक जाधव, अर्जुन पवळ, बंडू पवळ, मधुकर थोरात, मुकुंद परदेशी, अंकुश परदेशी, रंगनाथ पाबळे, संतोष पाबळे, बाळू महाराज पवार, उमेश पवळ, बालासाहेब शेरकर आदींसह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. जायकवाडीच्या पाण्यासाठी सिंदफणा पट्ट्यातील १४० गावच्या शेतकर्यांनी लोकलढा आंदोलन उभे केले आहे. या आंदोलनांतर्गत गेल्या १९ दिवसांपासून सिरसमार्ग येथे उपोषण सुरू होते. जायकवाडीचे पाणी सिंदफणा नदीपात्रात सोडा, सिंदफणा नदी पात्रात साखळी बंधारे बांधावेत, जायकवाडीच्या उजव्या कालव्यातून उपकालवा करावा आदी मागण्यासाठी हे उपोषण सुरू होते. गेल्या १९ दिवसापासून या उपोषणाची प्रशासनाने दखल न घेतल्याने शेतकऱ्यांनी नाराजी व्यक्त होत होती. दरम्यान याची दखल काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी घेऊन शेतकऱ्यांसह संवाद साधला. शुक्रवारी सिंदफणा पट्ट्यातील व लोकलढा आंदोलनातील सर्व शेतकऱ्यांची महत्त्वाचे बैठक आयोजित केली होती. या शेतकऱ्यांशी खासदार रजनीताई पाटील यांनी संवाद साधला. त्यावेळी रजनीताई पाटील म्हणाल्या की सिंदफणात पाणी येईपर्यंत आपण शेतकऱ्यांसोबत हा लढा लढू तसेच शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी लवकरच जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची भेट घेऊ. खासदार पाटील यांनी विश्वास व्यक्त केल्याने यानंतर काँग्रेस जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे, भाऊसाहेब जरांगे पाटील, राजेसाहेब काका पवळ, बाबुराव जेठे, राजाभाऊ महाराज कुटे, श्रीनिवास बेदरे, गणेश बजगुडे, नायब तहसिलदार कट्टे यांच्या हस्ते महादेव रडे, देविदास चव्हाण, दिनेश गुळवे यांनी जल प्राषण करून उपोषण स्थगित करण्यात आले.

शेतकऱ्यांसोबत काँग्रेस - सोनवणे- सिरसमार्ग येथे उपोषणकर्त्यांसमोर बोलताना रालुह सोनवणे म्हणाले, की शेतकरी रास्त मागण्यासाठी उपोषण करण्यास बसले असता त्यांची अठरा दिवस लोकप्रतिनिधी अथवा जिल्हा प्रशासनाने घेतली नाही, हे दुर्दैवी आहे. शेतकऱ्यांनी मात्र खचून जाऊ नये, शेतकऱ्यांसोबत असल्याचे सांगून प्रकृतीची चिंता म्हणून उपोषण स्थगित करण्याचे सूचवले. याचा आदर शेतकर्यांनी उपोषण स्थगित केले.

जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढू- गुळवे- शेतकऱ्यांच्या मागण्या संदर्भात लोकलढा आंदोलनाचे समन्वयक दिनेश गुळवे म्हणाले की शासनाने शेतकर्यांच्या मागण्यांचा योग्य विचार करावा. सिंदफणात बारमाही पाणी नसल्याने शेती व शेतकऱ्यांची बिकट अवस्था झाली आहे. शासनाने या मागण्यांची योग्य दखल न घेतल्यास येत्या दोन महिन्यांत जिल्हाधिकारी कार्यालयावर सर्व १४० गावातील शेतकर्यांचा मोर्चा काढण्याचा इशारा समन्वयक दिनेश गुळवे यांनी दिला.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# केज विधानसभा मतदारसंघातील 22 वर्षांचा झंझावात : डॉ. विमलताई मुंदडा - एक आठवण



केज विधानसभा मतदारसंघाला महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीपूर्वीपासूनचा एक वैभवशाली इतिहास लाभला आहे. महाराष्ट्राच्या निर्मितीपूर्वी मराठवाड्याचा हा भाग निजाम राजवटीत येत असल्याने, तो 'मोमिनाबाद' या नावाने स्वतंत्र मतदारसंघ म्हणून ओळखला जात होता. १९५२ ते १९५७ या कालावधीत अंबाजोगाईचे द्वारकाप्रसाद चौधरी आणि बीडचे ॲड. रामलिंग स्वामी यांनी या मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केले. त्या काळात निजाम राज्याचे मुख्यमंत्री बी. रामकृष्ण राव आणि आरोग्यमंत्री फुलचंद गांधी यांनी आपली जबाबदारी पार पाडली. द्वारकाप्रसाद चौधरी यांच्या कार्यकाळात मोमिनाबाद येथे टी. बी. मेमोरियल हॉस्पिटल सुरू झाले, ज्याचे उद्घाटन फुलचंद गांधी यांच्या हस्ते झाले. १९५७ मध्ये निजाम राजवट संपुष्टात आली आणि महाराष्ट्र राज्याच्या पहिल्या विधानसभा निवडणुकीत अनुसूचित जाती प्रवर्गातून गोविंदराव गायकवाड यांना प्रतिनिधित्वाची संधी मिळाली.

### ● मतदारसंघाचा ऐतिहासिक प्रवास

महाराष्ट्रात विधानसभेसाठी पहिल्यांदा १९५७ मध्ये मतदान झाले. या प्रक्रियेला आता ६६ वर्षे पूर्ण झाली आहेत. या ६६ वर्षांत सुरुवातीची फक्त १० वर्षेच सर्वसाधारण प्रवर्गातील उमेदवारांना केज मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली. १९५७ आणि १९६२ मध्ये हा मतदारसंघ अनुसूचित जातींसाठी आरक्षित होता. त्यानंतर १९६७ आणि १९७२ मध्ये तो सर्वसाधारण प्रवर्गासाठी खुला झाला. १९७८ पासून पुन्हा अनुसूचित जातींसाठी आरक्षित झाला आणि २००९ च्या पुनर्रचनेनंतर २०२८ पर्यंत असाच राहणार आहे. त्यामुळे ७१ वर्षांच्या इतिहासात फक्त १० वर्षे सर्वसाधारण उमेदवारांना संधी मिळाली, तर ५१ वर्षे अनुसूचित जातीच्या उमेदवारांनी नेतृत्व केले.सुरुवातीचे नेतृत्व१९५७ मध्ये गोविंदराव गायकवाड विजयी झाले आणि १९६२ मध्येही त्यांनी यश मिळवले, अशा रीतीने सलग १० वर्षे त्यांनी मतदारसंघाचे नेतृत्व केले. १९६७ मध्ये मतदारसंघ सर्वसाधारण प्रवर्गासाठी खुला झाला आणि माजलगावचे सुंदरराव सोळुंके काँग्रेसचे उमेदवार म्हणून विजयी झाले. त्यांना राज्य मंत्रिमंडळात स्थान मिळाले आणि त्यांनी मतदारसंघात लक्षणीय विकासकामे केली. १९७२ मध्ये बाबुराव आडसकर यांनी ॲड. बापूसाहेब काळदाते यांचा पराभव करून विजय मिळवला, ज्यामुळे ते राज्यभर चर्चेत आले. १९७२ नंतर मतदारसंघ पुन्हा अनुसूचित जातींसाठी आरक्षित झाला. १९७८ मध्ये बी. एन. सातपुते, १९८० मध्ये गंगाधर स्वामी आणि १९८५ मध्ये पुन्हा बी. एन. सातपुते विजयी झाले. १९७८ ते १९९० या काळात या दोघांनी १२ वर्षे नेतृत्व केले, पण त्यांना विशेष ठसा उमटवता आला नाही.

### ● डॉ. विमल मुंदडा यांचा उदय आणि योगदान

१९९० मध्ये भारतीय जनता पक्षाने उच्चशिक्षित आणि नवख्या डॉ. विमल मुंदडा यांना संधी दिली. त्यांनी बी. एन. सातपुते यांचा पराभव करून पहिला विजय मिळवला. त्यानंतर १९९५, २०००, २००५ आणि २००९ मध्ये डॉ. विमल मुंदडा यांनी सतत चढत्या मताधिक्याने विक्रमी विजय संपादन केले. त्यांना सलग २२ वर्षे केज मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली. या काळात त्यांनी राज्यमंत्रीपदापासून ते सार्वजनिक आरोग्य विभागाच्या कॅबिनेट मंत्रिपदापर्यंतचा चढता प्रवास केला. डॉ. विमल मुंदडा यांनी मतदारसंघात दिसणारी आणि लक्षात राहणारी विकासकामे केली. अंबाजोगाईला जिल्ह्याचा दर्जा मिळावा यासाठी त्यांनी मजबूत पायाभूत सुविधा उभ्या केल्या. मात्र, कॅन्सरच्या असाध्य आजाराने त्यांना ग्रासले आणि २०१२ मध्ये, अवजड उद्योग मंत्री म्हणून कार्यरत असताना त्यांनी जगाचा निरोप घेतला. त्यांच्या २२ वर्षांच्या कार्यकाळाने केज मतदारसंघाला सन्मान मिळवून दिला.

### ● पुढील नेतृत्व आणि वारसा


२००९ च्या पुनर्रचनेनंतर मतदारसंघाची भौगोलिक परिसीमा बदलली आणि तो पुन्हा अनुसूचित जातींसाठी आरक्षित झाला. आजारी असूनही डॉ. विमल मुंदडा यांना ४० हजार मतांच्या प्रचंड बहुमताने निवडून देण्यात आले, परंतु त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनानंतर पोटनिवडणुकीत पृथ्वीराज साठे विजयी झाले. २०१४ मध्ये सौ. संगिता ठोंबरे यांनी विजय मिळवला, तर २०१९ मध्ये डॉ. विमल मुंदडा यांच्या स्नुषा नमिता मुंदडा यांनी संगिता ठोंबरे यांचा पराभव करून विजय संपादन केला. आज नमिता मुंदडा, नंदकिशोर मुंदडा आणि अक्षय मुंदडा यांचा संपर्क आणि कामगिरी पाहता २०२८ पर्यंत त्यांची पकड कायम राहील, असे वाटते.

### ● डॉ. विमल मुंदडा यांचा अविस्मरणीय ठसा

डॉ. विमलताई मुंदडा यांनी १९९० ते २०१२ या २२ वर्षांत केज मतदारसंघाला नवी ओळख दिली. अंबाजोगाईच्या विकासासाठी त्यांनी उभे केलेले पायाभूत सुविधांचे जाळे अविस्मरणीय आहे. त्यांच्या निधनाला १५ वर्षे उलटली, तरी त्यांची लोकप्रियता अजूनही कायम आहे. त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त डॉ. विमलताई मुंदडा यांना भावपूर्ण आदरांजली!

## सेवानिवृत्त गटविकास अधिकारी काशिनाथ रापतवार यांचे निधन

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**



सेवानिवृत्त गटविकास अधिकारी तथा ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते काशिनाथ रापतवार यांचे वृद्धापकाळाच्या आजाराने २१ मार्च रोजी पहाटे १:३० वाजता निधन झाले. काशिनाथ रापतवार यांचा जन्म १९४१ साली अतिशय प्रतिकूल परिस्थितीत सर्वसामान्य कुटुंबात झाला. मोठ्या भावाचा शिक्षणाचा आदर्श घेत त्यांनी आपले पदवी पर्यंतचे शिक्षण स्वामी रामानंद तीर्थ कला व वाणिज्य महाविद्यालयात पुर्ण केले. या महाविद्यालयाच्या पहिल्या पदवीधर बॅचचे ते विद्यार्थी होते.पदवीची परीक्षा पास झाल्यानंतर त्यांनी महाराष्ट्र शासनाच्या जिल्हा परिषद विभागात विस्तार अधिकारी म्हणून सेवारत झाले. आणि गटविकास अधिकारी म्हणून ते सेवानिवृत्त झाले.

त्यांचे पश्चात संजय, विजय आणि अजय हे तीन मुले, दोन मुली नातवंडे आदि परिवार आहे. येथील शिक्षक मैत्री प्रतिष्ठान चे अध्यक्ष विजय रापतवार यांचे ते वडील होत.

## च-हाटा प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वीजजोडणीसाठी " 10 लक्ष रुपयांचा निधी सीईओ आदित्य जीवनेकडुन मंजूर ; जलसमाधी आंदोलनाचे यश

**बीड । प्रतिनिधी**



बीड तालुक्यातील सराटा येथील प्राथमिक आरोग्य केंद्र गेल्या आठ वर्षापासून पाच कोटी रुपये खर्चून बांधण्यात आले असून सुरुवातीपासून वीज जोडणी अभावी प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारत शोभेची वस्तू बनली असून प्राथमिक आरोग्य केंद्रात सुविधांचा अभाव आहे.

त्यामुळे वीजजोडणी साठी निधी देण्यात यावा या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वात दि.१४ आक्टोबर रोजी च-हाटा प्राथमिक आरोग्य केंद्रासमोरील साठवण तलावात जलसमाधी आंदोलन करून मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड आदित्य जीवने यांची प्रत्यक्ष भेट घेत निधीची मागणी केली होती. तेव्हा गांभीर्याने याचा विचार करून लवकरच निधीची उपलब्धता करून देण्यात येईल असे आश्वासन दिले होते. त्याचीच दखल घेत अखेर मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड आदित्य जीवने यांनी च-हाटा येथील प्राथमिक आरोग्य केंद्र ईमारत व कर्मचारी निवासस्थान यांच्या विद्युतीकरणा साठी विद्युत रोहित्र ( डी .पी.) बसविणे कामासाठी जिल्हा वार्षिक योजना सन२०२४- २०२५ अंतर्गत १० लाख रुपयांच्या निधीची तरतूद अग्नि सुरक्षा यंत्रणा खरेदी , दुरूस्ती, विस्तारीकरण व देखभाल , प्राथमिक आरोग्य केंद्र/उपकेंद्र दुरुस्ती व परीक्षण ,पीट बरीयल बांधकाम (लेखाशिर्ष -२२१०श्र ०९४-३१) अंतर्गत उपलब्ध होणाऱ्या तरतुदींच्या अंतर्गत करण्यात आली आले.त्यामुळे अखेर वीज जोडणी नंतर रूग्णांची हेळसांड थांबणार असुन बीडला उपचारासाठी लागणार आर्थिक भुर्दंड सहन करावा लागणार नाही याबद्दल आंदोलनकर्ते व ग्रामस्थांनी सीईओ जिप आदित्य जीवने आणि जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.ऊल्हास गंडाळ यांचे आभार मानले आहेत.

## प्रगतिशील शेतकरी सखाराम भुकन यांचे निधन

**कडा । प्रतिनिधी**



आष्टी तालुक्यातील टाकळी अमिया येथील प्रगतिशील शेतकरी सखाराम दगडू भुकन (वय ८२ वर्षे) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. याबाबत अधिक माहिती अशी की, टाकळी अमिया येथील शिक्षक बाबासाहेब भुकन यांचे वडील सखाराम भुकन हे गेल्या काही दिवसांपासून आजारी होते. शुक्रवारी रात्री दोन वाजता सखाराम भुकन यांचे दु:खत निधन झाले आहे. त्यांच्या पार्थिवावर टाकळी अमिया येथे शौकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात मुलगा बाबासाहेब,तीन मुली, सुन तसेच जावई इंजि. पी. बी. बोडखे, शिवाजी नवले, रमेश गदादे तसेच नातवंडे आणि नातेवाईकांचा मोठा परिवार आहे. अंत्यसंस्काराच्या कार्यक्रमास चेअरमन राजेश धोंडे, माजी पं. स. सदस्य डॉ. पांडुरंग चौधरी, माजी सरपंच काकासाहेब चौधरी, सरपंच भीमराव बोडखे, अशोक चौधरी, सेवानिवृत्त पोलिस उपनिरीक्षक शेख अन्सार, चेअरमन अरुण सायकड, शिवाजी चौधरी, विविध क्षेत्रातील मान्यवरांसह नातेवाईक उपस्थित होते.

## पाऊस आणि पाणी सजिव सृष्टीच्या निर्मितीसाठी लागणारे अविभाज्य घटक आहेत: जलप्रेमी बाजीराव ढाकणे

**बीड । प्रतिनिधी**

१६ मार्च ते २२ मार्च हा कालावधी जलजागृती सप्ताह म्हणून साजरा केला जातो या निमित्ताने आपणही पाणी जपून वापरा आणि इतरांनाही जपून वापरण्याचे आवाहन करावे असे आवाहन जलप्रेमी बाजीराव ढाकणे यांनी केले आहे. त्याचबरोबर पाऊसाचे पाणी आणि निसर्गनिर्मित पाणी जपून वापरावेच लागणार त्याशिवाय भविष्यात पाणी मिळणार नाही. पाऊस हा नैसर्गिक पाण्याचा मुख्य स्रोत आहे. तो नदी, तलाव, भूजल, आणि समुद्र यांच्या पाणीपुरवठ्याला पूरक ठरतो. पाऊस पडल्यामुळेच आपल्याला गोडे पाणी मिळते आणि शेती, जंगल, पशुपक्षी तसेच मानवांचे जीवन टिकून राहते.

पावसाचे महत्त्व: १. जलस्रोत भरण्यास मदत – पावसामुळे नद्या, तलाव, विहिरी आणि भूजलसाठे भरतात.

२. शेतीसाठी उपयुक्त – चांगला पाऊस असल्यास शेतीसमृद्ध होते आणि अन्नोत्पादन वाढते. ३. हवामान संतुलन राखते – पाऊस तापमान कमी करून वातावरण गार आणि प्रसन्न करतो.

४. जैवविविधतेसाठी महत्त्वाचा – पावसामुळे जंगल आणि तळ्यातील जलसंपत्ती टिकून राहते, जी प्राण्यांसाठी



आवश्यक असते. पावसाचे पाणी संकलन आणि संवर्धन कारण हवामान बदलामुळे अनियमित पाऊस आणि पाण्याची टंचाई वाढत आहे, त्यामुळे पाण्याचा साठा करणे गरजेचे आहे.

१. वर्षाजल संकलन:

घरांच्या छपरांवरील पाणी साठवून ते पुन्हा उपयोगात आणता येते.

शाळा, सोसायटी, आणि सार्वजनिक ठिकाणी वर्षाजल संकलन प्रणाली बसवावी. २. जमिनीखाली पाणी साठवणे (भूजल पुनर्भरण):

विहिरी, बंधारे, आणि झरे यामध्ये पावसाचे पाणी जिरवणे.

नदी व तलाव यांचे खोलीकरण करून पाणी साठवणे.

३. शेतीसाठी पाण्याचा जपून वापर: ठिबक आणि तुषार सिंचन पद्धतीचा अवलंब करावा.

पारंपरिक जलसंधारण पद्धती जसे की बांधबंदिस्ती, नाला खोलीकरण यांचा उपयोग करावा.

पाऊस हा आपल्याला मिळालेला नैसर्गिक वरदान आहे. तो योग्य पद्धतीने साठवला आणि जपला तरच पाणीटंचाईची समस्या दूर होऊ शकते. म्हणूनच, वर्षाजल संकलन व जलसंवर्धन यावर भर द्यायलाच हवा असे मत महा एनजीओ फेडरेशन, महाराष्ट्र राज्य चे बीड जिल्हा समन्वयक तथा सामाजिक कार्यकर्ते बाजीराव ढाकणे यांनी व्यक्त केले आहे.

### जाहीर प्रगटन

चौसाळा गावातील सर्व जनतेस कळविण्यात येते की आपल्या घरासमोरील दुकानासमोरील रोडवरील शासकीय जागेत असलेले अतिक्रमण माननीय जिल्हाधिकारी साहेब बीड यांचे आदेशानुसार सर्व ठिकाणचे अतिक्रमण काढणे चालू आहे यासाठी आपणास जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की आपण दिनांक २२ मार्च २०२५ पर्यंत आपले अतिक्रमण स्वखर्चाने काढून घ्यावे नसता २२ तारखेपासून ग्रामपंचायत कार्यालय चौसाळा, महसूल चौसाळा, शासकीय जागेतील असलेले सर्व अतिक्रमण, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जागेतील सर्व अतिक्रमण मशीन लावून काढण्यात येईल व होणाऱ्या नुकसानीस सर्वस्वी आपण जबाबदार राहाल व याचा खर्च संबंधित अतिक्रमणधारकांकडून वसूल करण्यात येईल तरी सर्वांनी याची नोंद घेऊन आपले अतिक्रमण तात्काळ काढून घ्यावे असे आवाहन सरपंच मंगल प्रेमचंद लोढा उपसरपंच अंकुश पळसराम कळासे ग्राम विकास अधिकारी बाबासाहेब चव्हाण यांनी केले आहे.

**सरपंच** — **मंगल प्रेमचंद लोढा**

**उपसरपंच** — **अंकुश पळसराम कळासे**

**ग्राम विकास अधिकारी**
**बाबासाहेब चव्हाण**

**ग्रामपंचायात कार्यालय चौसाळा ता. जि. बीड**

### वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**गेवराई, जि. बीड येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्री. ए. डी. कुलकर्णी यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक २५१/२०२५, तुकाराम विरूध्द निरंक**

ज्याअर्थी मयत गुलाब रंगनाथ चाळक हे दिनांक १८/०३/२०१९ रोजी मौजे किनगाव ता. गेवराई जि. बीड येथे मयत झालेले आहेत. अर्जदार १. तुकाराम पि. गुलाब चाळक, वय. ३५ वर्षे, धंदा. शेती, रा. किनगाव ता. गेवराई जि. बीड. २. अशोक पि. गुलाब चाळक, वय. ३९ वर्षे, धंदा. शेती, रा. किनगाव ता. गेवराई जि. बीड. ३. ज्ञानेश्वर पि. गुलाब चाळक, वय. ३३ वर्षे, धंदा. घरकाम, रा. किनगाव ता. गेवराई जि. बीड. ४. द्वारकाबाई भ्र. गुलाब चाळक, वय. ७७ वर्षे, धंदा. घरकाम, रा. किनगाव, ता. गेवराई जि. बीड. यांना शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे, करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत गुलाब रंगनाथ चाळक यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २०/०३/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले. पुढील तारीख २५/०४/२०२५

**(मार्फत– ॲड. चिकणे जे. एन. गेवराई)**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, क.स्तर, गेवराई**

**(स्वाक्षरीत)** **शिक्का**
**क.लिपीक**

### वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**गेवराई, जि. बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्री. कौस्तुभ नागेश मराठे यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक २५९/२०२५ शोभा – विरूध्द – निरंक**

ज्याअर्थी मयत नामे **हानुमंत पि.उध्दवराव पिंपळे रा. टाकळगांव ता. गेवराई जि.बीड हे दिनांक** ०९/१२/२०१० रोजी मौजे रामानंदतिर्थ शासकीय रुग्णालय अंबाजोगाई ता. अंबाजोगाई जि.बीड येथे मयत झाले आहेत.

अर्जदार :- १. शोभा भ्र. हनुमंत उर्फ हनुमंतराव पिंपळे, वय ५५ वर्षे, धंदा घरकाम, रा. टाकळगांव ता. गेवराई जि. बीड. २. प्रदिप पि. हनुमंतराव पिंपळे, वय ३२ वर्षे, धंदा नौकरी, रा. टाकळगांव ता. गेवराई जि.बीड. ३. प्रमोद पि. हनुमंतराव पिंपळे, वय २९ वर्षे, धंदा शेती, रा.टाकळगांव ता. गेवराई जि.बीड. शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे हानुमंत पि.उध्दवराव पिंपळे रा. टाकळगांव ता. गेवराई जि.बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २१/०३/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले. पुढील तारीख: २९/०४/२०२५

**(मार्फत – ॲड श्री. नागरे आय.बी. गेवराई)**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, क.स्तर, गेवराई**

**(स्वाक्षरीत)** **शिक्का**
**क.लिपीक**

### जाहीर प्रगटन

**मा. विशाखा बी. पाटील ६वे सह. दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**दिवाणी किरकोळ अर्ज नंबर ५११/२०२५, मुक्ताबाई श्रीपती शिंदे विरूध्द निरंक**

अर्जदार-१. मुक्ताबाई भ्र. श्रीपती शिंदे वय: ७० वर्षे, धंदा घराकाम, रा. कुमशी ता. जि. बीड. २. बाजीराव पि. श्रीपती शिंदे, वय: ६१ वर्षे, धंदा शेती, रा. कुमशी ता. जि. बीड. ३. हरिदास पि. श्रीपती शिंदे, वय: ४४ वर्षे, धंदा शेती, रा. कुमशी ता. जि. बीड..

विरुध्द

गैरअर्जदार- निरंक, **मागणी : वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत **श्रीपती डोंगरिबा शिंदे,** रा. कुमशी ता. जि. बीड यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी श्रीपती डोंगरिबा शिंदे, रा. कुमशी ता. जि. बीड मृत्यु दि. ०६/१०/२०२४ रोजी येथे मयत झालेले असून अर्जदार हा मयताचा मुलगा आहे.

वरील अर्जदार यांना शासकीय व खाजगी कामासाठी वारस प्रमाणपत्र याची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नाही असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि हया लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबदद्ल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना सदरहू मयत श्रीपती डोंगरिबा शिंदे, रा. कुमशी ता. जि. बीड. यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. आज दिनांक २० /०३ /२०२५ रोजी माझ्या सहिने व न्यायालयाचे शिक्याने दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २९/०४/२०२५ आहे. **(मार्फत– ॲड.टेकाडे)**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड**

**(स्वाक्षरीत)** **शिक्का**
**क.लिपीक**

### जाहीर प्रगटन

**मा. श्री. ए. एस. जगताप, दिवाणी न्यायाधिश साहेब, (क. स्तर), शिरुर कासार, यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नं. ७३ /२९२५, सोनाली व ईतर विरुध्द निल.**

अर्जदार :- १) सोनाली भ्र. जालिंदर शेळके वय २६ वर्षे, धंदा घरकाम व शेती, रा. नांदेवली, ता. शिरुर कासार, जि. बीड, २) संस्कृती पि. जालिंदर शेळके वय ०७ वर्षे, धंदा शिक्षण, रा. सदर. अ.पा.क. आई अर्जदार क्र. १., ३) स्वरा पि. जालिंदर शेळके वय ०४ वर्षे, धंदा शिक्षण, रा. सदर. अ.पा.क. आई अर्जदार क्र. १,

विरुध्द निल

**अर्ज :– बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

ज्यापेक्षा मयत नामे **जालिंदर पि. मोहन शेळके** रा. नांदेवली, ता. शिरुर का., जि. बीड, येथील रहिवाशी असुन ते दि. २९/०७/२०२३ रोजी जिल्हा रुग्णालय, बीड, ता. जि. बीड, येथे अर्जदारांचे राहते घरी मयत झालेल्या असुन अर्जदार क्र. १ हि मयताची पत्नि असुन अर्जदार क्र. २ व ३ हे मयताचे अज्ञान आपत्ये आहेत. तसेच अर्जदार हे उपारोक्त मयताचे कायदेशीर वारस आहेत. असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे उपरोक्त मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मदतील कोणी योग्य हरकती मुदतीत न कळविल्या तर सदरहु कोर्ट अर्जदार यांचे हक्का बद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु उपरोक्त मयताचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. २१/०३/२०२५ रोजी माझ्या सहीने न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.
पुढील तारीख – २३/०४/२०२५

**( मार्फत– ॲड, एच, एस, कोठुळे,)**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**सह. अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, क.स्तर, शिरूर कासार**

**(स्वाक्षरीत)** **शिक्का**
**क.लिपीक**

दैनिक
● epaper.marathwadapatra.com
# मराठवाडा पत्र
शनिवार, दि.२२ मार्च २०२५ पान ४

## जिल्ह्यामध्ये मनाई हुकूम जारी

**बीड । प्रतिनिधी**

सध्या बीड येथे विविध पक्षाच्या नेत्याचे प्रमुख कार्यकर्ते यांचे हाणमारीचे व्हिडीओ समोर येत असून संबंधित नेत्याचे कार्यकर्ते हे नेत्याचे समर्थनात आंदोलने करत आहेत. राजकीय पक्ष संघटनेच्या वतीने त्यांचे न्याय मागणीसाठी विविध प्रकारचे निदर्शने, उपोषणे, मोर्चे इत्यादी होण्याची शक्यता आहे. अचानक घडणा–या घटनावरून व किरकोळ कारणावरुन तणाव निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही तसेच या कालावधीत आरक्षणाच्या मागणीसाठी सर्व समाज व राजकीय पक्ष आक्रमक आहे. त्याअनुषंगाने जिल्हयात कायदा व सुव्यवस्था आबाधित रहावी यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्याकडून मनाई हुकूम जारी करण्यात आला आहे. दिनांक १९ मार्च २०२५ रोजीचे ००.०१ वाजेपासून ते २ एप्रिल २०२५ रोजीचे २४.०० वाजेपर्यंत बीड जिल्हयात या कालावधीत ▶▶ उर्वरित पान २ वर

# यापेक्षा आणखी काय दुर्दैव असावं?

## आईजवळ मयत मुलीवर अंत्यसंस्कारासाठी पैसे नसावेत

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील एक माता आपल्या अवघ्या सात वर्ष वयाच्या मुलीला घेवून जिल्हा रूग्णालयात धावत जाते. नऊ महिने पोटात सांभाळलेल्या लेकराला वाचविण्याचा प्रयत्न करते. परंतू डॉक्टर मात्र आता उपचार होणार नाहीत कारण उपचार सुरू करण्यापूर्वीच सदर सात वर्षीय मुलीचा मृत्यु झाल्याचे सांगतात. तेव्हा नऊ महिने पोटात सांभाळणाऱ्या आईला हतबल व्हावे लागते. दुखी मनाने या घटनेला नव्हे तर या प्रसंगाला सामोरे जावे लागते. परंतू दुख तिथेच थांबत नाही तर स्वत...च्या मयत मुलीच्या अंत्यसंस्कारासाठी आपल्याकडे पैसे नाहीत म्हणून त्या आपल्या मयत मुलीला जिल्हा रूग्णालयात सोडून जावे



**नऊ महिने पोटात सांभाळल्यानंतर सातव्या वर्षीचं एका आईने तिच्या मुलीला कायमचे गमावल्यानंतर मुलीच्या अंत्यसंस्कारासाठी देखील तिला हातबल व्हावे लागते. यापेक्षा मोठे दुर्दैव ते कोणते. बीड शहरातील या घटनेमुळे माणुस म्हणून घेणाऱ्या प्रत्येकाला वेदना झाल्याशिवाय राहणार नाहीत. पैसे नसल्यामुळे अंत्यसंस्कार मी करू शकत नाही असे एखाद्या आईला म्हणावे लागते हे २१ व्या शतकातील दुर्दैव म्हणावे लागेल.**

लागते हे माणुस म्हणून घेणाऱ्या कुठल्याही व्यक्तीच्या मनाला वेदना देणारे घटना आहे. बीड शहरातील जिल्हा रूग्णालयात शुक्रवारी सकाळी ९.३० वाजण्याच्या दरम्यान पुजा लोंढे या सात वर्षीय बालिकेला तिची आई सोनाली लोंढे यांनी जिल्हा रूग्णालयामध्ये धावत येवून दाखल केले. आपल्या बाळाला काहीतरी झाले आहे, उपचार हवेत, ती जगली पाहीजे या हेतूने जिल्हा रूग्णालयात आलेली सोनाली लोंढे डॉक्टरांच्या त्या उत्तराने मात्र निरूत्तर झाली असेल कारण उपचार सुरू करण्यापूर्वी डॉक्टरांनी तिच्या बाळाला मयत घोषीत केले होते. स्वत...च्या बाळाचा मृत्यु झाल्याचे दु...ख कुठल्याही आईला होणार ते सोनाली लोंढेला देखील झाले असेल परंतू मृत्युनंतर अंत्यसंस्कार करण्याची जी वेळ असते त्यासाठी पैसे नाहीत म्हणून ती माता रूग्णालयातून निघून जाते.

२१ व्या शतकामध्ये चंद्रावर कोण चाललंय, कोण चंद्रावरून आलंय, जगाने किती प्रगती केली, देशात प्रगतीचे, विकासाचे कोणते प्रकल्प सुरू आहेत या चर्चा सुरू असताना एखादी आई तिच्या मुलीवर अंत्यसंस्कारासाठी पैसे नाहीत म्हणून हतबल होत असेल तर यापेक्षा मोठे दुर्दैव कुठलीच असू शकत नाहीत. या घटनेमुळे माणुस म्हणून घेणाऱ्या प्रत्येकाच्या मनाला वेदना झाल्याशिवाय राहणार नाहीत असे असले तरी देखील समाजात चांगली माणसं आहेत हे विसरून चालणार नाही. अमजद खॉन यांना ही बाब समजल्यानंतर त्यांनी या चिमुकलीवर अंत्यसंस्कार करण्यासाठी किंवा मृत्युनंतर असलेली प्रक्रिया पुर्ण करण्यासाठी पुढाकार घेवून काही गोष्टी करण्याचे ठरविले आहे.

## डॉ.ओमप्रकाश शेटेंची आयुष्मानच्या अध्यक्षपदी निवड

### मुख्यमंत्र्यांची विश्वासू शिलेदारावर मोठी जबाबदारी

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र तथा गोरगरिबांचे देवदूत म्हणून परिचित असलेल्या डॉ.ओमप्रकाश शेटे यांना पदोन्नती मिळाली असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांची आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीच्या अध्यक्षपदी निवड केली आहे. त्यांची निवड व कार्यकक्षा याबाबत सरकारच्या वतीने शासकीय



परिपत्रक काढण्यात आले आहे. सरकारकडून झालेला हा सन्मान त्यांच्या कष्टाचे व परिश्रमाचे मूल्य अधोरेखित करणारा आहे. डॉ. शेटे यांच्याकडे आरोग्य क्षेत्रातील महत्वपूर्ण जबाबदारी आल्यामुळे सर्वसामान्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अत्यंत विश्वासू म्हणून डॉ.ओमप्रकाश शेटे सबंध महाराष्ट्राला परिचित आहेत. फडणवीस यापूर्वी मुख्यमंत्री असताना डॉ. शेटे यांनी मुख्यमंत्री ▶▶ उर्वरित पान २ वर

## धारूर तालूक्यातील ५६ ग्रामपंचायत चे सरपंच पदांची आरक्षण सोडत २५ मार्चला

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**




पुढील पाच वर्षा साठी तालुक्यातील ५६ ग्रामपंचायत चे सरपंच पदांची आरक्षण सोडत शासकीय नियम व आदेशा नुसार २५ मार्च रोजी सकाळी सकाळी ११-०० वाजता काढण्यात येणार आहे तरी तालूक्यातील नागरीकानी उपस्थीत राहावे असे आवाहन तहसीलदार श्रीकांत निळे यांनी केले आहे.

धारूर तालुक्यातील सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, ग्रामविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कडील राजपत्र अस प्रमाणे तालुकानिहाय जिल्हयातील सरपंचाची पदे वेगवेगळ्या प्रवर्गासाठी व महिलांसाठी पाच वर्षाकरिता सन २०२५ ते २०३० या दरम्यान गठीत होणा–या ग्रामपंचायतीकरिता आरक्षित करून संख्या निश्चित करण्यात आलेली आहे. धारूर तालुक्याचा आरक्षण तपशिल सरपंच पदे पुढील प्रमाणे अनुसूचित जाती–०९पदे, अनुसूचित जमाती–०२ पदे, नागरिकांचा मागास प्रवर्ग–१५ पदे, खुला प्रवर्ग–३० पदे असे एकुण ▶▶ उर्वरित पान २ वर



*बीड पोलीस अधीक्षक कार्यालय येथे मा वीरेंद्र मिश्र विशेष पोलीस महानिरीक्षक, संभाजीनगर यांच्या हस्ते सुसज्ज लूलशी श्ररल चे उदघाटन करण्यात आले. यावेळी पोलीस अधीक्षक बीड श्री नवनीत सर, अपर पोलीस अधीक्षक बीड श्री सचिन सर व सायबर पोलीस ठाणे चे प्रभारी श्री देविदास सर व सायबर स्टाफ उपस्थित होते.*

## एकमेव यश हे हजारो प्रश्नांवर उत्तर ठरलं : खुशबू नरुका

**बीड । प्रतिनिधी**

संघर्ष जिद्द चिकाटी संयम हे जेव्हा मिळून येतात तेव्हा यश हे लखलखत. हे फक्त आपल्याला वाचण्यातच पाहायला मिळत असते. पण याच जिवंत उदाहरण आज खुशबू नरूका यांनी राजस्थानलाच नव्हे तर भारत देशाला सुद्धा अनुभवायला मिळवून दिलं. प्राथमिक शिक्षण हे राजस्थानच्या शाळेमध्ये झाल्यानंतर खुशबू नरुका या २०२२ मध्ये दिल्ली येथे आल्या भारतामधली सर्वात अवघड समजली जाणारी यूपीएससी




या परीक्षेतून जिल्हाधिकारी होण्यासाठी तीन वेळा प्रयत्न केले पण या प्रयत्नात त्यांना अपयश



आलं. पण अखेर १९ मार्चला निकाल लागला आणि या डेप्युटी फील्ड ऑफिसर म्हणून यांची भारताच्या सेंट्रल सेक्रेटरी करून नियुक्ती झाली.

▶▶ उर्वरित पान २ वर

## जागतिक वनदिन धारूर वनपरिक्षेत्र कार्यालयात वृक्षारोपण करून साजरा

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

जागतिक वनदिन निमित्त किल्ले धारूर वन परिक्षेत्र कार्यालयाच्या वतीने वृक्षारोपणाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. वृक्षारोपन करून व वृक्षलागवड चे महत्व सांगून मान्यवराचे उपस्थीत साजरा करण्यात आला. धारूर येथील वन परीक्षेतील कार्यालयाचे वतीने जागतीक वनदीना निमित्त विवीध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी वनपरिक्षेत्र कार्यालय परीसरात वृक्षारोपण करून व वृक्ष लागवडीचे महत्व सांगून जागतीक वनदिन साजरा करण्यात आला. यावेळी



नायब तहसीलदार बाबुराव दळवे , नायब तहसीलदार नारायण काकडे एस बी आय धारूर शाखेचे शाखा व्यवस्थापक निलेश वाडीया जेष्ठ पत्रकार अनिल महाजन पत्रकार विश्वास शिनगारे , धारूर चे वनपरीक्षेत्र अधिकारी आय.के. घुणावत, धारूरचे वनपाल व्ही. एन.पवार , वडवणी चे वनपाल डी. एस.मोरे , वनरक्षक एन.आर.पाईक , व वन विभागाचे अधिकारी–कर्मचारी उपस्थित होते.

## शिवद्रोही प्रशांत कोरटकर व राहुल सोलापूरकर यांना अटक करून राजद्रोहाचे गुन्हे दाखल करावेत

### नसता जालना जिल्हयासह राज्याभरात तिव्र आंदोलन ; मराठा क्रांती मोर्चा आणि सर्व शिवप्रेमी संघटनांची बैठकीत निर्धार

**जालना । प्रतिनिधी**

शिवद्रोही प्रशांत कोरटकर व राहुल सोलापूरकर यांना ताबडतोब अटक करून राजद्रोहाचे गुन्हे तात्काळ दाखल करावेत नसता जालना जिल्हयासह राज्याभरात तिव्र आंदोलन करण्याचा निर्धार मराठा क्रांती मोर्चा आणि सर्व शिवप्रेमी संघटनांची बुधवार दि. १९ रोजी दुपारी २ वाजता मा. खा. भाऊसाहेब देशमुख सभागृह भाग्यनगर येथे बैठक घेवून करण्यात आला असल्याची माहिती आज घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत दिली. बैठकीच्या सुरवातीस इतिहासतज्ञ मा. म. देशमुख



यांच्या निधनाबद्दल दुखः व्यक्त करून श्रध्दांजली वाहण्यात आली. सदरील बैठकीमध्ये विविध निर्णय घेण्यात आले त्यामध्ये शिवद्रोही प्रशांत कोरटकर, राहुल सोलापूरकर यांना तातडीने अटक करून, राजद्रोहाचे गुन्हे दाखल करावेत आणि खटले फास्ट ट्रॅक कोर्टात चालवावेत. यावेळी डॉ. संजय लाखे पाटील, संतोष गाजरे, सुभाष कोळकर, अशोक पडूळ, जगन्नाथ काकडे, राजेंद्र गोरे, अरविंद देशमुख, संदीप ताडगे, काकासाहेब खरात, राम देठे, रवी वाडेकर, नरसिंग पवार, ज्ञानेश्वर माऊली ताकट, संजय देशमुख आदींची उपस्थिती होती.

## स्वच्छतागृहांची दुरवस्था; दुर्गंधीने नागरिक त्रस्त

**गेवराई । प्रतिनिधी**

शहरातील कोल्हेर विशीत नागरिकांच्या सोयीसाठी उभारण्यात आलेल्या सार्वजनिक स्वच्छतागृहांची दुरवस्था झाली आहे. त्यामुळे यातून निघणार्या मूत्रमिश्रित पाण्याने रस्त्यावर दुर्गंधी फैलावत आहे.वरून कीर्तन आणि आतून तमाशा' अशी म्हण अनेक वेळा असेच काहीसे चित्र शहरातील स्वच्छतागृहांबाबत आहे. महिला व पुरुषांच्या सोयीसाठी नगरपरिषदेने विविध ठिकाणी उभारलेल्या स्वच्छतागृहांच्या भिंती बाहेरून स्टायलीश फरशी अन् ॲल्युमि नियम ॲक्रॅलिक असलेल्या चकचकीत आहेत. मात्र, आत जाताच नजरेस पडतो दारूच्या बाटल्यांचा खच, फुटलेल्या



फरशा, घाणीने माखलेल्या भिंती अन् दुर्गंधीचे साम्राज्य, पत्रकार यांच्या केलेल्या पाहणीत आढळून आले.

शहरातील नागरिकांसाठी सार्वजनिक ठिकाणी आणि रस्त्यांच्या कडेला स्वच्छतागृह आणि मुतार्या उभारल्या आहेत. त्यांची देखभाल दुरुस्ती आणि स्वच्छतेची कामे घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत केली जातात. यासाठी दरवर्षी कोट्यवधी रुपये खर्च केले जातात. मात्र, या स्वच्छतागृहांची योग्यरीत्या नितीनेमाने राखली जात नाही. बाहेरून स्टायलीश फरशी अन् ॲल्युमिनियम ॲक्रॅलिकमुळे चकाचक आणि स्मार्ट दिसणार्या स्वच्छतागृहांचे आतील चित्र विदारक असते. स्वच्छतागृहात दारूच्या ▶▶ उर्वरित पान २ वर

